क्रमांक :- जमीन -१९०७/५४९/प्र. क्र. १७९/ज-१
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक - ६ सप्टेंबर, २००७.

विषय- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
मौ. एक्सर, ता. बोरीवली येथील तलाव सुशोभिकरण
करण्यास परवानगी मिळण्याबाबत.

आदेश:

मौजे एक्सर, ता. बोरीवली, नभूक्र. १५५० क्षेत्र ३३८१.६० चौ.मी. व नभूक्र. १६१२ क्षेत्र १२९२९.५० चौ.मी. ही तलावाखालील शासकीय जमीन मा. आमदार श्री. गोपाळ शेट्टी, वि.स.स. हे सदर तलावाचे सुशोभिकरण त्यांच्या आमदार फंडातून करणार असल्याने त्यांनी सदर तलाव सुशोभिकरणाकरिता ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना विनंती केलेली होती. त्यांच्या सदर विनंतीच्या अनुषंगाने सदर जमीन त्यावरील तलावाचे सुशोभिकरण करण्याकरिता भाडेपट्ट्याने देण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्र. सी/कार्या-३डी/कवि-१२८/०७, दि. ३०/५/२००७ अन्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, मौजे एक्सर, ता. बोरीवली, नभूक्र. १५५० क्षेत्र ३३८१.६० चौ.मी. व नभूक्र. १६१२ क्षेत्र १२९२९.५० चौ.मी. ही तलावाखालील शासकीय जमीन सुशोभिकरणासाठी त्यांना खालीलप्रमाणे अटी/शर्तींवर या आदेशाच्या तारखेपासून केवळ एक वर्षाच्या कालावधीकरिता अनुज्ञप्ती तत्वावर देण्यास शासनाची मंजुरी देण्यात येत आहे.

अटी- अ) जमिनीचा ताबा/मालकी ही शासनाचीच राहील.

ब) सदर परवानगी एक वर्षाच्या कालावधीनंतर आपोआप संपुष्टात येईल, त्यासाठी वेगळे आदेश काढण्याची आवश्यकता नाही. तसेच परवानगी संपल्यानंतर दिलेल्या अनुज्ञप्तीमध्ये कोणतीही वाढ करण्यात येणार नाही.

क) जमिनीवर तलावाचे सुशोभिकरण करण्यासाठी व अन्य सुरक्षिततेसाठी लागणारा खर्च आमदार महोदयांना त्यांच्या निधीतून करावा लागेल. त्यासाठी शासनाकडून अन्य कोणतीही आर्थिक मदत मिळणार नाही.

ड) सदर जमिनीवरील झाडे व पाणी वगैरे बाबींची मालकी ही शासनाचीच राहील. उक्त सुशोभिकरणाची सुरुवात करताना "सदर भूखंड महाराष्ट्र शासनाच्या मालकीचा असून सदर भूखंड/तलावाचे सुशोभिकरण करण्यात येत आहे" अशा स्वरुपाचा फलक लावण्यात यावा.

इ) वरील शर्तींचा भंग झाल्यास अथवा जमिनीचा/तलावाचा कोणत्याही प्रकारे दुरुपयोग झाल्याचे आढळून आल्यास सदरची परवानगी/अनुज्ञप्ती रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हाधिकारी/ शासनास राहतील. त्यासाठी कोणतेही कारण देण्याचे शासनावर बंधन राहणार नाही.

फ) सुशोभिकरण करणाऱ्या यंत्रणेचा या जागेवर कुठल्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.

ग) या कामासाठी योग्य त्या प्राधिकरणांच्या पूर्वपरवानग्या घेणे संबंधितांवर बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वि. शि. वखारे)
अवर सचिव,
महसूल व वन विभाग

प्रति,
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०००५१.

D:V-3-1\VA\Order2007.lwp



Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय


जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय, बांद्रा (पू) मुंबई-५१

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७११, ६५५०१११ फॅक्स : ६५५६८०५ E mail – collrmsd@vahoo.com


क्रमांक :-सी/कार्या-३डी/कावि-१२८/०७

दिनांक :- /१०/२००७

5 OCT

संदर्भ :- शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. जमीन- २६०७/५४९/प्र.क्र. १७९/ज-२ दि.६/१०/२००७

मौजे एक्सर, ता. बोरीवली, न.भू.क्र. १५५० क्षेत्र ३३८१.६० चौ.मी. व न.भू.क्र. १६१२ क्षेत्र १२१२९.५० चौ.मी. ही तलावाखालील शासकीय जमीन मा. आमदार श्री. गोपाळ शेट्टी विधानसभा सदस्य यांना त्यांचे आमदार फंडातून सुशोभिकरणासाठी केवळ एक वर्षाच्या कालावधीसाठी अनुज्ञप्ती तत्वावर देण्यास शासनाने त्यांचेकडील संदर्भाकीत ज्ञापनान्वये अटी/शर्तीवर मंजुरी दिली आहे.

सबब मौजे एक्सर, ता. बोरीवली, न.भू.क्र. १५५० क्षेत्र ३३८१.६० चौ.मी. व न.भू.क्र. १६१२ क्षेत्र १२१२९.५० चौ.मी. ही तलावाखालील शासकीय जमीन मा. आमदार श्री. गोपाळ शेट्टी विधानसभा सदस्य यांना त्यांचे आमदार फंडातून सुशोभिकरणासाठी एक वर्षाच्या कालावधीसाठी अनुज्ञप्ती तत्वावर खालील अटी/शर्तीवर मंजुर करण्यांत येत आहे.

**अटी /शर्ती:**

१) जमिनीचा ताबा/मालकी ही शासनाचीच राहील.

२) सदर परवानगी एक वर्षाच्या कालावधीनंतर आपोआप संपुष्टात येईल, त्यासाठी वेगळे आदेश काढण्याची आवश्यकता नाही. तसेच परवानगी संपल्यानंतर दिलेल्या अनुज्ञप्तीमध्ये कोणतीही वाढ करण्यांत येणार नाही.

३) जमिनीवर तलावाचे सुशोभिकरण करण्यासाठी व अन्य सुरक्षिततेसाठी लागणारा खर्च आमदार महोदयांना त्यांच्या निधीतून करावा लागेल. त्यासाठी शासनाकडून अन्य कोणतीही आर्थिक मदत मिळणार नाही.

४) सदर जमिनीवरील झाडे व पाणी वगैरे बाबींची मालकी शासनाचीच राहील. उक्त सुशोभिकरणाची सुरुवात करतांना "सदर भूखंड महाराष्ट्र शासनाच्या मालकीची असून सदर भूखंड/तलावाचे सुशोभिकरण करण्यांत येत आहे" अशा स्वरुपाचा फलक लावण्यांत यावा.




Scanned by CamScanner

५) वरील शतीचा भंग झाल्यास अथवा जमिनीचा/तलावाचा कोणत्याही प्रकारे दुरुपयोग झाल्याचे आढळून आल्यास सदरची परवानगी/अनुज्ञप्ती रद्द करण्यांचे संपूर्ण अधिकारी जिल्हाधिकारी/शासनास राहतील. त्यासाठी कोणतेही कारण देण्याचे शासनावर बंधन राहणार नाही.

६) सुशोभिकरण करणाऱ्या यंत्रणेचा या जागेवर कुठल्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.

७) या कामासाठी योग्य त्या प्राधिकरणाच्या पूर्व परवानग्या घेणे संबंधीतांवर बंधनकारक राहील.

८) प्रश्नांकित जमीनीची किंमत आकारण्यांबाबत अथवा अनुज्ञप्ती तत्त्वाची रक्कम आकारण्यांबाबत अथवा भाडेपट्टा वसूल करणेंबाबत शासन निर्णयानुसार व शासनाने ठरवून दिलेल्या दरानुसार आकारणी करुन येणारी रक्कम शासनजमा करणें संबंधीतांवर बंधनकारक राहील.

९) वरील सर्व अटी/शर्ती मान्य असल्याचे रु. २२०/- चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र सात दिवसात सादर करावे.

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही असे

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

COLLECTOR OF MUMBAI SUBURBAN DISTRICT
जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,
मा. श्री. गोपाल शेट्टी,
विधानसभा सदस्य,
शेट्टी हाऊस, लोकमान्य टिळक नगर,
पोयसर, कांदिवली(पश्चिम),
मुंबई - ४०० ०६७

L-635-sns

महाराष्ट्र शासन

क्रमांक : जमीन-२६०७/५४१/प्र. क्र. १७९/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- 02/08/2008

प्रति,
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व),
मुंबई-४०० ०५१.

विषय - जमीन- मुंबई उपनगर जिल्हा
मौजे एक्सर, ता. बोरीवली येथील नभूक्र. १५५०, क्षेत्र ३३८१.६० चौ.मी. जमिनीवर समाजमंदीर, सांस्कृतिक केंद्र, वाचनालय, इत्यादी बांधकाम करण्याबाबत मा. आमदार श्री. गोपाळ शेट्टी यांनी केलेली विनंती.

संदर्भ:- १) शासनाचे समक्रमांकाचे दि. ६/९/२००७ रोजीचे ज्ञापन.
२) आपलेकडील पत्र क्र. सी/कार्या-४/बोरीवली/वशि-७९३/०७, दिनांक १०/१२/२००७.
३) आपलेकडील पत्र क्र. सी/कार्या-४/बोरीवली/वशि-७९३/०७, दि. २६/५/२००८.

कृपया उपरोक्त संदर्भित शासनाचे समक्रमांकाचे ज्ञापन व आपलेकडील दि. १०/१२/२००७ तसेच दि.२६/५/२००८ रोजीचे पत्रे पहावीत.

२. मा. आमदार श्री. गोपाळ शेट्टी, वि.स.स. यांनी मौजे एक्सर, ता. बोरीवली, नभूक्र. १५५० क्षेत्र ३३८१.६० चौ.मी., व नभूक्र. १६१२ क्षेत्र १२९२९.५० चौ.मी. च्या सुशोभिकरणाकरिता मागितलेल्या परवानगीच्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील दि. ६/९/२००७ च्या ज्ञापनान्वये तलाव सुशोभिकरणाकरिता अटी व शर्तीवर मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

३. त्यानंतर नभूक्र. १५५० मधील ३३८१.६० चौ.मी. क्षेत्राच्या जमिनीवर (तलावाच्या जमिनीवर) समाजमंदिर, सांस्कृतिक केंद्र, वाचनालय, इत्यादी बांधकामे करण्याबाबत मा. आमदार श्री. गोपाळ शेट्टी यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी उपरोक्त संदर्भित क्र. २ व ३ येथील पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन असे कळविण्यात येते की, शासनाच्या समक्रमांकाच्या दि. ६/९/२००७ च्या ज्ञापनातील अटी/शर्तींना अधिन राहून इतर सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता होत असल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मान्यतेने सदर जमिनीवर अनुज्ञेय असलेला चटईक्षेत्र निर्देशांक म्हणजेच ना विकास क्षेत्रातील जमीन असल्याने ०.०४ चटईक्षेत्र निर्देशांक वापरण्यास पुढीलप्रमाणे

207/08

...२...

C:\J-3-PVA\Letter-2008 Part-2.lwp

यांचे कार्यालय
AUG 2008

Scanned by CamScanner

अटींवर शासनाने मान्यता दिलेली आहे.

१) सदर जमिनीचा अनुज्ञप्ती कालावधी संपल्यानंतर जमीनीचा व त्यावरील बांधकामाचा ताबा जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी घ्यावा व त्यावरील करण्यात येणाऱ्या बांधकामाचा मंजूर प्रयोजनाकरीता वापर करण्यासंदर्भात दैनंदिन देखभाल व व्यवस्थापन करण्यासाठी बांधकामाचा ताबा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे संपूर्द करण्यात यावा.

हे पत्र नगर विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

(वि. सि. वखारे)
अवर सचिव,
महसूल व वन विभाग.

प्रतिलिपी: १) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
२) नगर विकास विभाग (नवि-११), मंत्रालय, मुंबई.

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७९९, फॅक्स : ६५५६८०५ E mail – collrmsd@yahoo.com


क्रमांक : सी/कार्या-३डी/कावि-१२८/२००८

दिनांक : /१०/२००८ 22 OCT 2008

वाचले : १) शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र.जमीन-२६०७/५४१/प्र.क्र.१७१/ज-३ दि.६/९/०७.

२) या कार्यालयाचे पत्र क्र.सी/कार्या-३डी/कावि-१२८/२००७ दि.५/१०/२००७.

३) शासन, महसूल व वन विभाग पत्र क्र.जमीन-२६०७/५४१/प्र.क्र.१७१/ज-३ दि.२/८/२००८.

**आदेश :**

मौजे एक्सर, तालुका बोरीवली येथील न.भू.क्र.१५५० क्षेत्र ३३८१.६० चौ.मी. व न.भू.क्र.१६१२ क्षेत्र १२९२९.५० चौ.मी. ही तलावाखालील शासकिय जमीन मा. आमदार श्री. गोपाळ शेट्टी, विधानसभा सदस्य यांना त्यांचे आमदार फंडातून सुशोभिकरणासाठी एक वर्षाच्या कालावधीसाठी अनुज्ञाप्ती तत्वावर देण्यास उद्देशिकेतील क्र.१ च्या शासन ज्ञापना अन्वये अटी / शर्तीवर मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार उद्देशिकेतील क्र.२ कडील या कार्यालयाने आदेश पारित केले आहेत.

तद्नंतर मा. आमदार गोपाळ शेट्टी यांनी त्यांचे पत्र दि.१७/९/२००७ नुसार न.भू.क्र.१५५० क्षेत्र ३३८१.६० चौ.मी. या (तलावाच्या जमिनीवर) भरणी करुन त्या जागेवर समाजमंदिर, सांस्कृतीक केंद्र, वाचनालय, इत्यादी बांधकामे करण्यास परवानगी मागितली होती. त्या अनुषंगाने या कार्यालयाने शासनास अहवाल सादर केला होता. त्याबाबत शासन, महसूल व वन विभाग पत्र क्र.जमीन/२६०७/५४१/प्र.क्र.१७१/ज-३ दि.२/८/२००८ अन्वये मौजे ~~मालवणी~~, तालुका बोरीवली येथील नगर भूमापन क्रमांक १५५० मधील ३३८१.६० चौ.मी. क्षेत्राच्या जमिनीवर (तलावाच्या जमिनीवर) समाज मंदीर, सांस्कृतिक केंद्र, वाचनालय इत्यादी बांधकामे करण्याबाबत मा. आमदार श्री. गोपाळ शेट्टी यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने सदरच्या (तलावाच्या जमीनीवर) जमीनीवर अनुज्ञेय असलेल्या चटई क्षेत्र, निर्देशांक म्हणजेच ना विकास क्षेत्रामधील असल्याने ०.०४ चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्यास अटि / शर्तीवर मान्यता देण्यात आली आहे.

सबब, मौजे मालवणी ता. बोरीवली येथील न.भू.क्र.१५५० मधील ३३८१.६० चौ.मी. क्षेत्राच्या जमिनीवर (तलावाच्या जमीनीवर) शासन ज्ञापन दि.६/९/२००७ मधी अटी / शर्तीना अधिन राहून इतर सर्व तांत्रिक बाबीची पुर्तता होत असल्यास बृहन्मुंबई महानगर पालीकेच्या मान्यतेने सदर जमीनीवर अनुज्ञेय असलेला चटई क्षेत्र निर्देशांक म्हणजेच ना विकास क्षेत्रातील ०.०४ चटई क्षेत्र वापरण्यांस खालील अटी / शर्तीवर परवानगी देण्यांत येत आहे.



Scanned by CamScanner

अटी / शर्ती

१) सदरचे जमीनीवर (तलावाचे जमीनीवर) बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या मान्यतेने शिवाय कोणत्याही प्रकारचे बांधकाम करणेत येऊ नये.

२) शासनाचे / जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे मान्यतेने शिवाय तलावात कोणत्याही प्रकारची भरणी करण्यात येवू नये.

३) सदर शासन जमिनीचा अनुज्ञाप्ती कलावधी संपल्यानंतर जमिनीचा व त्यावरील बांधकामाचा ताबा या कार्यालयास देण्यात यावा.

४) जमिनीवरील समाज मंदीर, सांस्कृतिक केंद्र, वाचनालय इत्यादी बांधकामे / सुशोभिकरणासाठी लागणारा सर्व आमदार निधीतून करावयाचा आहे. त्यासाठी शासनकडून कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत मिळणार नाही.

५) सदर जमिनीवरील करावयाच्या बांधकामाबाबत बृहन्मुंबई महानगर पालीकेची मांन्यता व तांत्रिक बाबीची पुर्तता करुन घेण्यात यावी.

६) जमीनीची मालकी ही शासनाची राहील.

७) या कार्यालयाचे आदेश क्र.सी/कार्या-३डी/कावि-१२८/०७ दि.५/१०/२००७ नुसार घालण्यात आलेल्या अटी / शर्ती लागू राहतील.

सही/-
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,
मा. श्री. गोपाळ शेट्टी
विधानसभा सदस्य,
शेट्टी हाऊस, लोकमान्य टिळक नगर,
पोयसर, कांदिवली (प),
मुंबई-४०० ०६७.

प्रत :
१) मा. प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, यांचेकडील पत्र दि. ०२/८/२००८ चे अनुषंगाने माहीतीकरीता सविनय सादर.
२) तहसिलदार बोरीवली यांचेकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरीता रवाना.
३) नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांचेकडे माहीती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरिता

उपरोक्तांवर मा. जिल्हाधिकारी यांची सही आहे.

Kavi-128-kvb

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१ (159)

Ph.6556799, 6550111 Fax : 6556805 email address:- collrmsd@yahoo.com

क्र. :- सी/कार्या-३डी/कावि-१२८/२००८
दिनांक :- /१२/२००८
12 DEC 2008

वाचले :- १) शासन, महसूल व वन विभागाकडील पत्र क्र. जमीन -२६०७/५४१/प्र.क्र. १७९/ज-३ दि.२/८/२००८
२) या कार्यालयाचे आदेश समक्रमांक दि.२२/१०/२००८

**शुध्दिपत्रक:**

उपरोक्त शासन पत्रान्वये मौजे एक्सर ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १५५० मधील ३३८१.६० चौ.मी. क्षेत्राच्या जमिनीवर (तलावाच्या जमिनीवर) समाज मंदिर, सांस्कृतिक केंद्र, वाचनालय इत्यादी बांधकामे करण्यांबाबत मा. आमदार श्री. गोपाल शेट्टी यांनी केलेल्या विनंतीचे अनुषंगाने सदरच्या (तलावाच्या जमीनीवर) जमीनीवर अनुज्ञेय असलेल्या चटई क्षेत्र, निर्देशांक म्हणजेच ना विकास क्षेत्रामधील असल्याने ०.०४ चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्यास अटी/शर्तीवर मान्यता देण्यांत आली आहे. तद्नुषंगाने या कार्यालयाचे आदेश दि.२२/१०/२००८ रोजी पारीत करणेंत आले आहेत.

प्रकरणी या कार्यालयाचे दि.२२/१०/२००८ रोजीचे आदेशातील अट क्र. २ प्रमाणें कोणतीही अटी शासनाचे पत्र नसल्याचे मा. आमदार महोदयांनी निदर्शनास आणून दिले आहे. त्यामूळे या कार्यालयाचे उपरोक्त आदेशातील अट क्र. २ मध्ये बदल करणें आवश्यक आहे.

सबब मी, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा या कार्यालयाचे आदेश दि.२२/१०/२००८ मधील अट क्र. २ मध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यांस मान्यता देत आहे.

| करीता | वाचावे |
|---|---|
| शासनाचे/जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे मान्यतेशिवाय तलावात कोणत्याही प्रकारची भरणी करण्यांत येऊ नये. | बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या मन्यतेने सदर जमिनीवर अनुज्ञेय असलेला चटईक्षेत्र निर्देशांक म्हणजेच ना विकास क्षेत्रातील जमीन असल्याने ०.०४ चटईक्षेत्र निर्देशांक वापरुन बांधकाम करण्यांत यावे. |

या कार्यालयाचे आदेश दि.२२/१०/२००८ मधील इतर अटी/शर्ती कायम राहतील.

स्वाक्षरीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही आहे.

(sd/-)
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

स्वा/प्रत
(sd/-) ९/१२/२००८

प्रति,
मा. श्री. गोपाळ शेट्टी,
विधानसभा सदस्य,
शेट्टी हाऊस, लोकमान्य टिळक नगर,
पोयसर, कांदिवली,
मुंबई - ४०० ०६७

(sd/-) ९/१२/०८
(sd/-) ९/१२/०८

Kavi-128-mrs

(3) Issued



Scanned by CamScanner

क्रमांकः- जमिन-२६०७/५४१/प्र.क्र.१७९/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- २७ मे,२००९

विषय - <u>जमीन - मुंबई उपनगर जिल्हा</u>
मौ.एक्सर, ता.बोरीवली येथील तलाव सुशोभिकरण करण्यास परवानगी मिळण्याबाबत.

पहा :- १) शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग क्र.जमिन- २६०७/५४१/ प्र.क्र.१७९/ज-३, दिनांक ६.९.२००७
२) शासन ज्ञापन पत्र, महसूल व वन विभाग क्र.जमिन-२६०७/५४१/ प्र.क्र.१७९/ज-३, दि. २.८.२००८

<u>ज्ञापन</u> :

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना त्यांचेकडील पत्र क्र.सी-कार्या-३ डी/काबि-१२८/२००८ ला अनुलक्ष्न विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग क्र.जमिन-२६०७/५४१/प्र.क्र.१७९/ज-३, दि.६.९.२००७ अन्वये त्यामध्ये नमूद केलेल्या अटी/ शर्तीवर मौजे-एक्सर, ता.बोरीवली नभूक्र.१५५०,क्षेत्र ३३८१.६० चौ.मी. व नभूक्र.१६१२, क्षेत्र १२९२९.५० चौ.मी. ही तलावाखालील शासकीय जमिन सुशोभिकरणासाठी आदेशांच्या तारखेपासून म्हणजेच दि.६.९.२००७ पासून एक वर्षाच्या कालावधीकरीता अनुज्ञप्ती तत्वावर देण्यास मंजुरी देण्यात आली होती. सदर एक वर्षाचा अनुज्ञप्तीचा कालावधी दि.५.९.२००७ रोजी संपुष्टात आला असून, सुशोभिकरणाचे काम पूर्ण झालेले नसल्याने, सदर एक वर्षाचा अनुज्ञप्तीचा कालावधी शासन ज्ञापन दि.६.९.२००७ मधील अटी/शर्तीवर दि.६.९.२००८ ते दि.५.९.२००९ असा एक वर्षाकरीता वाढविण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदर कालावधीत तलावाचे सुशोभिकरणाचे काम पूर्ण करण्यात यावे व या पुढे या कामास कोणतीही मुदतवाढ मंजूर करण्यात येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(वि. सि. वखारे)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर, प्रशासकीय इमारत,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय
30 MAY 2009
1094

प्रतिलिपी -
१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकणभवन, नवी मुंबई
२) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, पुणे
३) उपसंचालक, भूमी अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई
४) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६) सहाय्यक संचालक, नगररचना व मूल्यनिर्धारण, मुंबई उपनगर जिल्हा
७) नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई
८) ज-३ कार्यासन (निवड नस्ती), महसूल व वन विभाग

Scanned by CamScanner

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१
Ph.6556799, 6558111 Fax : 6556805 email address:- collrmsd@yahoo.com

क्र. :- सी/कार्या-३डी/कवि-१२८/२००७
दिनांक :- /०६/२००९
29 JUN 2009

वाचले : १) शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. जमीन-२६०७/५४१/प्र.क्र.१७१/ज-३ दि.०६/०९/२००७.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. सी /कार्या -३डी/कवि-१२८/२००७ दिनांक ०५/१०/२००७.
३) शासन, महसूल व वन विभागाकडील पत्र क्र. जमीन -२६०७/५४१/प्र.क्र. १७१/ज-३ दि.२/८/२००८.
४)मा. आमदार श्री. गोपाल शेट्टी यांचे दिनांक०१ / १२ /२००८ चे पत्र.
५) या कार्यालयाचे पत्र दिनांक २९ / १२ /२००८.
६) या कार्यालयाचे आदेश समक्रमांक दि.२२/१०/२००८.
७) शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. जमीन-२६०७/५४१/प्र.क्र.१७१/ज-३, २७/५/०५/२००९.

**आदेश :**

मौजे एक्सार ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १५५० मधील ३३८१.६० चौ.मी. व न.भू.क्र.१६१२ क्षेत्र १२९२९.५० चौ.मी. ही तलावाखालील शासकीय जमीन मा. आमदार श्री. गोपाल शेट्टी, विधानसभा सदस्य यांना त्यांचे आमदार फंडातून सुशोभिकरणासाठी एक वर्षाच्या कालावधीसाठी अनुज्ञप्ती तत्वावर देण्यास उपोद्घातातील क्र.१ च्या शासन ज्ञापना अन्वये अटी /शर्तीवर मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार उपोद्घातातील क्र.२ नुसार या कार्यालयाने आदेश पारित केलेले आहेत.

सदर दोन्ही तलावाखालील शासकीय जमीनी सुशोभिकरणांसाठी शासन ज्ञापनाच्या तारखेपासून म्हणजेच दिनांक ०६/०९/२००७ पासून एक वर्षाच्या कालावधी करीता अनुज्ञप्ती तत्वावर देण्यास मंजूरी देण्यात आली होती सदर एक वर्षाचा कालावधी दिनांक ०५/०९/२००८ रोजी संपुष्टात आल्यानंतर सुशोभिकरणाचे कामपूर्ण झाले नसल्यामुळे अनुज्ञप्तीचा कालावधी वाढवून मिळणेबाबत मा.आमदार श्री.गोपाल शेट्टी यांनी त्यांचेकडील दि.१/१२/२००९ चे पत्रान्वये या कार्यालयास विनंती केली होती. त्या अनुषंगाने या कार्यालयाने सविस्तर अहवाल दिनांक २९/१२/२००८ रोजीचे पत्राने शासनास सादर करण्यात आला असता, उपोद्घातातील क्र.७ च्या शासन ज्ञापनान्वये सदर एक वर्षाचा अनुज्ञप्तीचा कालावधी, पुर्वीचा शासन ज्ञापन दिनांक ०६/०९/२००७ मधील अटी / शर्तीवर दिनांक ०६/०९/२००८ ते ०५/०९/२००९ असा एक वर्षाकरीता वाढवून देण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

सबब मौजे एक्सार ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १५५० मधील ३३८१.६० चौ.मी. व न.भू.क्र.१६१२ क्षेत्र १२९२९.५० चौ.मी. ही तलावाखालील शासकीय जमीन मा. आमदार श्री. गोपाल शेट्टी, विधानसभा सदस्य यांना त्यांचे आमदार फंडातून सुशोभिकरणासाठी दिनांक ०६/०९/२००८ ते ०५/०९/२००९ असा एक वर्षाच्या कालावधीसाठी अनुज्ञप्ती तत्वावर खालील अटी / शर्ती नुसार मंजूरी देण्यात येत आहे.

**अटी / शर्ती :**

१) जमिनीचा ताबा / मालकी ही शासनाचीच राहील.

२) दिनांक ०६/०९/२००८ ते ०५/०९/२००९ या वाढवून दिलेल्या कालावधीत तलावाचे सुशोभिकरण करण्याचे काम पूर्ण करण्यात यावे व या पुढे सदर कामास कोणतीही मुदतवाढ मंजूर करण्यात येणार नाही.

३) वरील शर्तींचा भंग झाल्यास अथवा जमिनीचा / तलावाचा कोणत्याही प्रकारे दुरुपयोग झाल्याचे आढळून आल्यास सदरची परवानगी / अनुज्ञप्ती रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हाधिकारी / शासनास राहतील, त्यासाठी कोणतेही कारण देण्याचे शासनावर बंधन राहणार नाही.

४) सुशोभिकरण करणा-या यंत्रणेचा या जागेवर कुठल्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.

५) या कार्यालयाचे आदेश क्र. सी/कार्या ३डी/कावि १२८/०७ दिनांक ०५/१०/२००७ नुसार घालण्यात आलेल्या अटी / शर्ती लागू राहतील.

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही असे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

प्रति,
मा. श्री. गोपाळ शेट्टी,
विधानसभा सदस्य,
शेट्टी हाऊस, लोकमान्य टिळक नगर,
पोयसर, कांदिवली,
मुंबई - ४०० ०६७

प्रत : १) मा.प्रधान सचिव (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय ,मुंबई ४०० ०३२ यांजकडे त्यांजकडील पत्र दि.२७/०५/२००९ अन्वये माहिती करिता सादर.
२) मा. विभागिय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सादर.
२) तहसिलदार, बोरीवली यांचेकडे माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
३) नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांचेकडे माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही असे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

ISSUED



Scanned by CamScanner

क्रमांक-जमीन-२६०७/५४१/प्र.क्र. १७९/ज-३
महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक १० जून, २००९

प्रति,
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा
प्रशासकीय इमारत,
बांद्रा (पूर्व), मुंबई-५१

विषय- जमीन- मुंबई उपनगर जिल्हा
मौजे एक्सर, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १५५० क्षेत्र ३३८१.६० चौ. मी. व न.भू.क्र. १६१२ क्षेत्र १२९२९.५० चौ. मी. ह्या तलावाखालील शासकीय जमीनी आमदार श्री. गोपाळ शेट्टी यांच्या आमदार फंडातून सुशोभिकरण करण्यास दिलेल्या परवानगी बाबत..

संदर्भ- १) शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्रमांक- जमीन-२६०७/५४१/प्र.क्र. १७९/ज-३, दिनांक ६ सप्टेंबर, २००७

२) शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्रमांक- जमीन- २६०७/५४१/प्र.क्र. १७९/ज-३, दिनांक २७ मे, २००९

उपरोक्त संदर्भाकित क्रमांक १ येथील दिनांक ६ सप्टेंबर, २००७ च्या ज्ञापनान्वये मौजे एक्सर, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १५५० क्षेत्र ३३८१.६० चौ. मी. व न.भू.क्र. १६१२ क्षेत्र १२९२९.५० चौ. मी. ह्या तलावाखालील शासकीय जमीनीवर आमदार श्री. गोपाळ शेट्टी, वि.स.स. यांचे आमदार फंडातून सुशोभिकरण करण्यास विहित अटी/शर्तीवर एक वर्षाच्या अनुज्ञप्ती तत्वावर परवानगी देण्यात आली आहे. त्यानंतर दिनांक २७ मे, २००९ च्या ज्ञापनान्वये सदर कालावधी पूर्वीच्याच अटी/शर्तीवर पुढे एक वर्षाकरिता वाढवून देण्यास परवानगी देण्यात आली आहे. शासनाच्या उपरोक्त दिनांक ६ सप्टेंबर, २००७ च्या आदेशातील अटी/शर्ती स्वयंस्पष्ट आहेत. आता यासंदर्भात आपणास असे कळविण्याचे निदेश आहेत की, विषयांकित प्रकरणी आपल्या कार्यालयाने प्रस्तुत जमीनपैकी नभूक्र १५५० मधील ३३८१.६० चौ. मी. जागेसंदर्भात क्रमांक-सी/कार्या-३ डी/कावि-१२८/२००८, दिनांक २२ ऑक्टोबर, २००८ अन्वये निर्गमित केलेले आदेश तसेच क्रमांक -सी/कार्या-३ डी/कावि-१२८/२००८, दिनांक १२ डिसेंबर, २००८ अन्वये निर्गमित केलेल्या शुध्दीपत्रकानुसार उचित कार्यवाही करण्यात यावी.

(वि. सि. वखारे)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रत,
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, महापालिका मार्ग, मुंबई-०१ यांना माहितीस्तव अग्रेषित.

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७११, फॅक्स : ६५५६८०५ E mail – collrmsd@yahoo.com

क्रमांक : सी/कार्या-३डी/कावि-१२८/२००८
दिनांक : /६/२००९

29 JUN 2009

प्रति,

मा. गोपाल शेट्टी,
विधानसभा सदस्य,
शेट्टी हाऊस, लोकमान्य टिळक नगर,
पोयसर, कांदिवली, मुंबई -४००० ६७.

**विषय:-** **जमिन : मुंबई उपनगर जिल्हा**
**मौजे - एक्सर, तालुका - बोरीवली येथील न.भू.क्र.१५५० क्षेत्र ३३८१.६० चौ.मी. व न.भू.क्र.१६१२ क्षेत्र १२९२९.५० चौ.मी. हि तलावा खालील शासकीय जमीन आमदार फंडातून सुशोभिकरण करण्यास दिलेल्या परवानगीबाबत.**

**संदर्भ :-** **१) शासन महसूल व वन विभाग ज्ञापन क्र.जमीन-२६०७ / ५४१/प्र.क्र.१७९/ज-३ दिनांक १०/६/२००९**
**२) आपल्याकडील पत्र दि.१०/६/२००९, १३/६/२००९ व १६/६/२००९**

महोदय,

आपले उपरोक्त पत्राचे संदर्भाने येथे स्पष्ट करण्यांत येते की, आपणांस मौजे - एक्सर, तालुका बोरीवली नगर भू-मापन क्रमांक १५५० क्षेत्र ३३८१.६० चौ.मी. व नगर भू-मापन क्रमांक १६१२ क्षेत्र १२९२९.५० चौ.मी. ह्या तलावाखालील शासकीय जमीनी आमदार फंडातून सुशोभिकरण करण्यांस शासन महसूल व वन विभागाकडील क्र. जमीन -२६०७/२४१/प्र.क्र.१७९/ज-३ दिनांक ०६-०९-२००७ अन्वये केवळ एक वर्षाच्या कालावधीसाठी अनुज्ञाप्ती तत्वावर मंजुरी देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने या कार्यालयाचे आदेश क्र. सी /कार्या -३डी/कावि-१२८/२००७ दिनांक ०५/१०/२००७ निर्गमित करणेंत आले आहेत. तसेच आपले विनंतीचे अनुषंगाने, शासन पत्र दि. २/८/२००८ अन्वये सर्व तांत्रिक बाबींची पुर्तता होत असल्यास बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या मान्यतेने सदरच्या(तलावाच्या जमीनीवर) अनुज्ञेय असलेल्या चटई क्षेत्र निर्देशांक वापरणेंस परवानगी देण्यांत आलेली आहे. त्या अनुषंगाने या कार्यालयाचे आदेश दि.२२/१०/२००८ व शुध्दिपत्रक दि.१२/१२/२००८ रोजी निर्गमित करणेंत आले आहे.

सदर एक वर्षाचा कालावधी दि.५/९/२००८ रोजी संपुष्टात आल्याने, शासनाने सदर अनुज्ञप्तीचा कालावधी, शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन दि.२७/५/२००९ नुसार दि.६/९/२००८ ते ५/९/२००९ पर्यंत वाढवून देण्यांस मान्यता देण्यांत आली आहे. सबब त्यानुसार या कार्यालयाचे आदेश क्र.सी/कार्या-३डी /कावि-१२८/२००७ दिनांक २९/६/२००९ निर्गमित करणेंत आले आहेत.

Scanned by CamScanner

तसेच, प्रकरणी शासन महसूल व वन विभागाकडील पत्र दि.१०/६/२००९/ अन्वये या कार्यालयाचे आदेश समक्रमांक दि. २२/१०/२००८ व शुध्दिपत्रक दि.१२/१२/२००८ अन्वये कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यांत आले आहेत. सदर पत्राची प्रत मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका यांना देखील अग्रेषित करण्यांत आलेली आहे.

सदरचे शासन पत्रातील आदेश हे स्वयंस्पष्ट आहेत. तरी, आपण बृहन्मुंबई महानगर पालिकेशी संपर्क साधून आपण मागणी केल्याप्रमाणें अनुज्ञेय असलेला चटई क्षेत्र निर्देशांक ०.०४ प्रमाणें योग्य ते बांधकाम करण्यांस व सदर बांधकामाचे ठिकाणी दिवाबत्ती लावण्यास ह्या कार्यालयाची हरकत नाही. तरी आपण बृहन्मुंबई महानगर पालिकेशी संपर्क साधून योग्य ती कार्यवाही करावी.

मूळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही असे.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

प्रत :- सहाय्यक आयुक्त, आर/मध्य विभाग, महानगर पालिका मंडई इमारत, स्वामी विवेकानंद मार्ग, बोरीवली, मुंबई - ४०० ०९२

२/- बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या नियमानुसार दिवाबत्ती लावणेंस परवानगी देणेचे अधिकारी आपणांस प्रदान करणेंत आलेमुळे दिवाबत्ती लावणेची परवानगी आपले स्तरावरुन देणेंची योग्य ती कार्यवाही करणेंत यावी.

मूळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही असे.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

ISSUED

Scanned by CamScanner